# रोजगार हमी योजना- जवाहर विहिर लाभार्थी निवडीची सुधारीत पध्दती.

**(महाराष्ट्र शासन नियोजन विभागाचे शासन निर्णय क्रमांक जविका-२००२/प्र-६८/रोहयो-१० दिनांक २४ मे २००२)**

## जवाहर विहिर लाभार्थी निवड जिल्हा समन्वय समिती

| | |
|---|---|
| १) पालकमंत्री | अध्यक्ष |
| २) विधानसभेचे जिल्यातील आमदार | आमत्रित |
| ३) अध्यक्ष, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४) उपाध्यक्ष, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५) जिल्हाधिकारी | सदस्य |
| ६) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | सदस्य |
| ७) अतिरिक्त मु.का.अ. जि.प.गोंदिया | सदय्स्य |
| ८) कार्यकारी अभियंता (सिंचन) जिल्हा परिषद | सदस्य-सचिव |

## जवाहर विहिर लाभार्थी निवड तालुका समन्वय समिती

| | |
|---|---|
| १) तालुक्यातील विधानसभेचे आमदार | अध्यक्ष |
| २) पंचायत समितीचे सभापती | सदस्य |
| ३) पंचायत समितीचे उप सभापती | सदस्य |
| ४) उपजिल्हाधिकारी (रोहयो) | सदस्य |
| ५) तहसिलदार | सदस्य |
| ६) गट विकास अधिकारी पंचायत समिती | सदस्य-सचिव |

टिप- एका तालुक्यात एकापेक्षा अधिक विधानसभेचे आमदार असतील तर ज्या विधानसभा सदस्यांच्या क्षेत्रात खेडयांची संख्या सर्वात अधिक असेल ते अध्यक्ष म्हणून राहतील व इतर सहअध्यक्ष म्हणून राहतील.

## लाभार्थीची  निवडीची पध्दत-

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाचे निर्णय  क्रमांक-जविका -२००२/प्र-६८/रो-१० दिनांक २४ मे २००२ मध्ये निर्देशित केल्यानूसार **जवाहर विहिरीच्या लाभार्थ्याची निवडीची पध्दती** खालील खालीलप्रमाणे आहे.

१)	शासन प्रथमतः जिल्हयाचा लक्षांक संबंधित वर्षाकरीता निश्चित करेल.

२)	शासनाने विहित केलेल्या लक्षांकानूसार  नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक १ जुलै १९९९ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक  सुत्राप्रमाणे  तालुकावार लक्षांक मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद निश्चित करतील व गट विकास अधिका-यांना कळवतील        ( १५ दिवस )

३)	मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी वरील दोन मधे नमूद केल्याप्रमाणे तालुक्याचा लक्षांक कळविल्यावर,गट विकास अधिकारी, ग्रामपंचयायत व पंचयायत समितीच्यानोटीस बोर्डवर तालुक्याला मिळालेला लक्षांक व या योजनेचे लाभ घेण्याकरीता इच्छूक लाभार्थ्यांनी अर्ज, ग्रामपंचायतीकडे किती तारखेपर्यंत करावयाचा आहे.हे जाहीर करील. ग्रामपंचायत ग्रामसभेच्या निर्दशनात आणून प्राप्त झालेले सर्व अर्ज गट विकास अधिका-याकडे पाठवतील (१५ दिवस )

४)	गट विकास अधिकारी हे वरील ३ मध्ये नमूद केलेल्या विहीत कालावधीत लाभार्थ्याचे अर्ज, ग्रामपंचायतीकडून गोळा करील व मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.याची  काळजी घेईल.  ( २१ दिवस )

५)	गट विकास अधिकारी आलेल्या अर्जाची छाननी करुन सर्व अर्हताधारक अर्जदारांच्या नावाची यादी तालुकावार पंचायत समिती व ग्रामपंचयायतीच्या नोटीस बोर्डवर लावतील.  ( १५ दिवस )

६)	गट विकास अधिकारी सर्व अर्हताधारक अर्जदारांची यादी तालुका समन्वय समितीपुढे सादर करील .तालुका समन्वय समितीने  तालुका लक्षांकाच्या दुप्पट लाभार्थ्याच्या निवडीबाबत  त्यांची शिफारस करावयाची आहे.  (१५ दिवस )

७)	तालुका समन्वय समितीने शिफारस केलेली लक्षांकाच्या दुप्पट असलेली लाभार्थ्याची प्राथमिक यादी, मुख्य कार्यकारी अधिकारी,,जिल्हा परिषद यांचेकडे गट विकास अधिकारी सादर करतील व मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद,यादीची छाननी  स्वतः अथवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत करतील व शिफारस केलेल्या लाभार्थ्याची पात्रता  तपासून पाहतील व जवाहर विहीरीच्या मार्गदर्याक तत्वे व नियमाप्रमाणे  पात्र आहेत याची खत्री करतील.  ( १५ दिवस)

८)	वरील ७ प्रमाणे छाननी केलेली यादी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालकमत्रयाच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हा जवाहर विहीर लाभार्थी निवड समितीपुढे सादर करतील. ( १५ दिवस )

९) जिल्हा समन्वय समिती पुर्ण जिल्हयातील प्रत्येक तालुक्याच्या लक्षांकाइतके लाभार्थीची निवड करील. ( १५ दिवस )

१०) तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, यांनी प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही.करुन प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करुन जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावणे. ( १५ दिवस )

**लाभार्थीला जवाहर विहिरीसाठी लागणारे दस्ताऐवज.**

१) गाव नमूना ७/१२ ची मुळ प्रत
२) गांव नमूना ८ अ ची मुळ प्रत
३) शेतीचे स्थळ दर्शविणारा नकाशा.
४) अनूसुचित जाती /जमाती साठी जातीचे प्रमाणपत्र.
५) नमूना ८अ मध्ये एकापेक्षा जास्त व्यक्ती असल्यास इतरांची समंतीपत्र
६) जमिन सिंचनाखाली येत नसल्याचा कृषी विभागाचा दाखला
७) अपत्याचा दाखला ( जन्म तारीख समाविष्ट असलेला)

लाभार्थीची वैयक्तीक व शेतजमिनीची माहिती दर्शविणारा अर्ज व उपरोक्त दस्ताऐवज जोडून ग्रामसेवकाकडे सादर करावा.

**लक्षित लाभार्थी -**

१) ०.६० ते २.०० हेक्टर पर्यंतचे मागासवर्गिय अल्पभुधारक ( लक्षांकाच्या २० टक्के)
२) ०.६० ते २.०० हेक्टर पर्यतचे मागासवर्गियेत्तर अल्पभुधारक (लक्षांकाच्या ४०टक्के)
३) २.०१ ते ४.०० हेक्टर नाबार्डच्या व्याख्येनूसार पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेले कोरडवाहू अल्पभुधारक (लक्षांकाच्या ४० टक्के )

लाभार्थीच्या शेतात पुर्वीपासून विहिर असेल त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. लाभार्थ्याकडे ०.६० हेक्टर जमिन आवश्यक आहे.त्याहून कमी क्षेत्र असलेल्या लाभार्थ्यास विहिर मंजूर करता येत नाही.